# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राजुरा वनपरिक्षेत्रातील (जि.चंद्रपूर) शेतकऱ्यावर वाघाने केलेल्या हल्ल्याबाबत

**(१) ३४१ (१८-०३-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ४२५१६ ला दिनांक १२ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा वनपरिक्षेत्रातील (जि.चंद्रपूर) कक्ष क्र. १६८ मध्ये चिचबोडी येथील शेतकरी देविदास तलांडे यांच्यावर वाघाने हल्ला करून जखमी केल्याची घटना दिनांक १३ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जखमी झालेल्या शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (१३-०१-२०२१) :** (१) व (२) दिनांक १२/१२/२०१९ रोजी श्री.देविदास तलांडे यांना वाघाने हल्ला करुन जखमी केल्याचा तक्रार अर्ज वनपरिक्षेत्र अधिकारी, राजुरा यांना प्राप्त झाला.

सदर प्रकणाच्या चौकशी दरम्यान घटनास्थळावर वाघ, बिबट व अस्वल या वन्यप्राण्यांचे पगमार्क, विष्ठा आढळून आलेली नाही. तसेच वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, राजुरा यांनी दिलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रात वाघाने हल्ला करुन जखमी केल्याचे नमूद केलेले नाही.

सबब संबंधित जखमी व्यक्तीस वाघ या वन्यप्राण्यांने हल्ला करुन जखमी केल्याचे सिध्द झाले नसल्याने नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नागरिकांसाठी वन विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनाबाबत

**(२) ५४२ (१८-०३-२०२०). डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नागरिकांसाठी जनकल्याण योजना व कार्यक्रमाची आखणी करतांना त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी लोकसंवादातून तळागाळातील लोकांची मते जाणून घेण्याचा प्रयोग वन विभागाकडून केला जाणार असल्याचे दिनांक ५ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्केपर्यंत होण्यासाठी तालुकास्तरावरील वृक्ष लागवड व संगोपन आराखडा तयार करुन त्यांची अंमलबजावणी करणे, मनुष्य वन्यप्राण्यातील संघर्ष कमी करण्यासाठीच्या योजनांची अंमलबजावणी व नवीन योजनांची आखणी, वन क्षेत्रातील विविध योजना व कार्यक्रमाव्दारे रोजगार निर्मिती, शिकार, वणवा, चराई आणि

अतिक्रमण यासारख्या वन संरक्षणासंबंधीच्या उपाययोजना करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेण्याबाबत व सदर योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (२९-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे. या संदर्भात दिनांक ०५/०९/२०१९ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.
(२) व (३) या संदर्भात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी जनतेबरोबर दर ६ महिन्यांनी लोकसंवाद कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. लोकसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी वन विभागातील अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले होते. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात राज्यभरात २३३ लोकसंवादाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

---

## अपर आयुक्त, आदिवासी अमरावती यांनी सेवा ज्येष्ठता डावलून पदोन्नती दिल्याबाबत

**(३) ८३२ (१८-०३-२०२०). श्री.सुरेश धस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अपर आयुक्त, आदिवासी अमरावती यांनी सन २०१७ मध्ये वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना कनिष्ठ लिपिक पदी पदोन्नती देताना ०९ कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठता डावलून पदोन्नती दिली गेली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवेने कनिष्ठ असूनही या ०९ कर्मचाऱ्यांना पदावनत केल्यामुळे ते मॅटमध्ये गेल्याने त्यांना पुन्हा पदोन्नती दिल्याने सेवा ज्येष्ठता कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्याने त्यांनी पुन्हा अपर आयुक्तांकडे वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मॅटमध्ये गेलेले कर्मचारी व न गेलेले सेवा ज्येष्ठता कर्मचारी यांना नियमानुसार पदोन्नती देवून चुकीची सेवा ज्येष्ठता यादी बनविणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२१-१२-२०२०) :** (१), (२) व (३) दिनांक ०१/०१/२०१७ च्या ज्येष्ठता यादीनुसार कनिष्ठ लिपिक पदी पदोन्नती देण्यात आली होती. तथापि, काही सेवाज्येष्ठ कर्मचाऱ्यांची नावे ज्येष्ठता यादीत समाविष्ठ झाली नसल्याची बाब निदर्शनास आल्यावर सुधारीत ज्येष्ठता यादी तयार करण्यात आली व त्यातील ज्येष्ठ कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली. त्यामुळे अगोदर पदोन्नती दिलेल्या ९ कनिष्ठ कर्मचाऱ्यांना पदावनत करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर पदावनत आदेशाला महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने स्थगिती दिली आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सेवा ज्येष्ठता यादीबाबत अद्यावत माहिती वेळेवर सादर न केल्याबाबत प्रकल्प अधिकारी, औरंगाबाद यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घोडबंदर नाक्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याबाबत

**(४) १७१९ (१८-०३-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घोडबंदर गावातील पुरातन घोडबंदर किल्ल्याकडे जाणारा रस्ता व शहरात प्रवेशासाठी बांधलेल्या नवीन ६० मीटर रस्त्याच्या नाक्यावर महामार्गाजवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याबाबतचा निर्णय महापालिकेने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने सदर पुतळयाकरीता किती निधीची तरतूद करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, सदरहू कामाकरीता किती कालावधी लागणे अपेक्षित आहे व सदर कामाला केव्हापासून सुरुवात होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात सदर कामासाठी ३.६५ कोटी रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे.

दिनांक ०२/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत पुतळा समितीसमोर प्रस्ताव ठेऊन, समितीच्या मान्यतेअंती सदर कामास सुरूवात करण्यात येणार आहे.

सदर पुतळा बसविणेकामी कमीत कमी २ वर्षाचा कालावधी लागणार असल्याचे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## म्हाडाने वांद्रे (पश्चिम) येथील रंगशारदा प्रतिष्ठानला दिलेल्या भुखंडावर विकासकाने अवैधपणे हॉटेलचे बांधकाम केल्याबाबत

**(५) ३०१४ (०२-०६-२०२०). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाने वांद्रे (पश्चिम) येथील रंगशारदा प्रतिष्ठानला नाटयसंस्कृती जोपासण्यासाठी सन १९८१ मध्ये ३,४७६ चौ. मीटरचा भूखंड सवलतीच्या दरात ९० वर्षाच्या भाडेतत्वावर दिल्यानंतर रंगशारदाचे तत्कालीन विश्वस्त आणि विकासक प्रभुदास लोटिया यांच्यामध्ये झालेल्या नियोजित करारानुसार सदर भूखंडावर नाटयगृह कलाकारांना राहण्यासाठी ५५ खोल्यांचे बांधकाम करून त्याबदल्यात उर्वरित चटई क्षेत्राचा वापर खाजगी व्यवसायासाठी करण्याचे स्पष्ट केले होते मात्र विकासकाने रंगशारदा हॉटेल्स प्रा. लि. ही कंपनी सुरू करून धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीशिवाय ७० खोल्यांचे हॉटेल बांधल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या उक्त ट्रस्टवरील विश्वस्त सर्वश्री.सुनील कर्वे, विजय गोखले व डॉ.सविता गोखले यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रतिष्ठानाची जुनी कागदपत्रे पाहताना रंगशारदा संदर्भातील व्यवहारात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रतिष्ठानच्या विश्वस्तांनी नाटयगृह उभारण्यासंदर्भात काही अटी व शर्ती नमूद असलेल्या कुलमुखत्यार पत्राचा (पॉवर ऑफ ॲटर्नी) विकासकाने गैरवापर करीत नियोजित करारनाम्याचा भंग करुन त्यास अंतिम स्वरूप न देता म्हाडा व इतर यंत्रणांची फसवणूक करुन चुकीच्या पध्दतीने हॉटेल रंगशारदा बांधल्याचे अतिरिक्त मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी केलेल्या चौकशीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी विकासकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.जितेंद्र आव्हाड (३१-१२-२०२०) :** (१) मराठी नाटक व मराठी साहित्याचा प्रसार व्हावा व त्याची जोपासना व्हावी या उद्देशाने म्हाडा प्राधिकरणाच्या दिनांक १६/०५/१९८० रोजीच्या ठरावान्वये ३००० चौ.मी. भूखंड व दिनांक १४/०१/१९८६ रोजीच्या ठरावान्वये ४७६ चौ.मी. भूखंड असा एकूण ३४७६ चौ.मी. वांद्रे येथील म्हाडाच्या मिळकतीवरील भूखंड रंगशारदा प्रतिष्ठानला ९० वर्षाच्या कालावधीसाठी दर ३० वर्षांनी भाडेपट्टा नुतनीकरणाच्या काही अटी व शर्तीनुसार भाडेतत्वावर वितरित करण्यात आला.

दिनांक २३/०१/१९८१ रोजी रंगशारदा प्रतिष्ठानतर्फे श्री.प्रभुदास वीरचंद लोटीया यांस मुखत्यारपत्र देण्यात आले, तसेच विश्वस्त रंगशारदा प्रतिष्ठान व श्री.प्रभुदास वीरचंद लोटीया यांचेदरम्यान विकास करारनामा करण्यात आला. सदर विकास करारनाम्यामध्ये नाट्यगृह कलाकारांना राहण्यासाठी ५५ खोल्याचे बांधकाम करण्याबाबत नमूद नसल्याचे दिसून येते.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (नियोजन, प्राधिकरण / MMRDA) यांनी दिनांक ३१/०८/२००१ रोजी व बृहन्मुंबई म.न.पा. यांनी दिनांक २७/०९/२००१ रोजी सदरहू प्रतिष्ठानास मंजुरी दिलेल्या सुधारित नकाशानुसार इमारतीमध्ये एकूण ७१ खोल्यांचे बांधकाम झाले आहे.
(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) या प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणात मा.उच्च न्यायालयाच्या व शासनाच्या आदेशानुसार सदरहू प्रकरणाची सुनावणी तत्कालीन अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्याकडे ठेवण्यात आली होती. रंगशारदा प्रतिष्ठानच्या विश्वस्तांनी भूखंडाचा वापर जास्तीत जास्त वाणिज्य प्रयोजनार्थ करताना मूळ उद्दिष्टय साध्य झालेले नसल्याचे, तसेच मूळ करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग केलेला असल्याचे, सुनावणीअंती स्पष्ट झाल्याने तत्कालीन अप्पर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांनी याबाबत दिनांक १०/१२/२०१९ रोजी आदेश पारित केलेले आहेत.

उक्त भुखंडाचा वापर रंगशारदा प्रतिष्ठानने श्री.लोटीया यांना व्यक्तिगत नावाने विकास हक्क हस्तांतरण केले. श्री.लोटीया यांनी हे हक्क परस्पर (म्हाडा किंवा धर्मादाय आयुक्त यांची परवानगी न घेता) रंगशारदा हॉटेल्स प्रा.लि. यांना हस्तांतरीत केले. याचा आधार घेऊन रंगशारदा हॉटेल्स प्रा.लि. या त्रयस्त पक्षाने म्हाडाची परवानगी न घेता तसेच प्रत्यक्ष बांधकाम होण्यापूर्वीच ८ व्यक्तींना वाणिज्यिक गाळयांचे वितरणे केले. सदरहू प्रतिष्ठानने करारनाम्यातील कलम २(i) मधील तरतुदींचे उल्लंघन करुन म्हाडाची फसवणूक केल्याचे दिसून आल्याने मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांच्या दिनांक २९/१०/२००४ च्या आदेशात नमूद केलेले रुपये ५४,०१,७०४/- इतके अधिमुल्य, त्यावरील व्याजासह म्हाडाकडे तात्काळ जमा करावे. सदरहू रक्कमेवरील व्याज म्हाडाच्या प्रचलित नियमानुसार परिगणित करुन रंगशारदा प्रतिष्ठानास पुढील १ महिन्यांत कळविण्यात यावे. म्हाडाकडून निश्चित केलेले सदर मुल्य व त्यावरील व्याजाची रक्कम सदरहू प्रतिष्ठानाने त्यापुढील ४ महिन्याच्या कालावधीत समान हफ्त्यात म्हाडाकडे भरावे. तसेच सदर भुखंडावर बांधकाम करतांना, रंग शारदा प्रतिष्ठानने म्हाडाकडे विनंती केल्यानंतर, दिनांक १८/०९/१९८६ रोजीच्या पत्रान्वये म्हाडाने सदर आराखड्यांना मंजूरी दिलेली आहे. सदर भुखंडाकरीता मंजूरी देतांना ना-हरकत प्रमाणपत्र रक्कम आकारण्यात आली होती किंवा कसे, याची म्हाडा स्तरावर प्रथमत: खातरजमा करुन, तशी रक्कम आकारण्यात आली नसल्यास त्यावेळच्या प्रचलित धोरणानुसार सदर भुखंडापैकी ज्या क्षेत्रावर वाणिज्यिक वापर झाला आहे, त्याचा विचार करुन

ना-हरकत प्रमाणपत्र रक्कम म्हाडाकडून निश्चित करण्यात यावी व सदरची रक्कम पुढील १ महिन्यात कळविण्यात यावी. म्हाडाकडून निश्चित केलेली सदर मूल्य व व्याजाची रक्कम रंगशारदा प्रतिष्ठानने त्यापुढील ४ महिन्यांच्या कालावधीत समान हफ्त्यात म्हाडाकडे भराणा करावे.

तसेच, मुंबई मंडळाने दिनांक १८/०९/१९८६ रोजी दिलेली मंजूरीबाबत मुंबई मंडळाकडे उपलब्ध नसलेल्या कागदपत्राच्या नस्तीचा मुंबई मंडळाने कसोशीने शोध घ्यावा. सदर नस्ती/कागदपत्रे न सापडल्यास कार्यालयीन पध्दतीनुसार गुन्हा दाखल करावा. तसेच यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर म्हाडाने पुढील १ महिन्यात कार्यवाही करावी आणि जर, रंगशारदा प्रतिष्ठानने विहित कालावधीत सदर रक्कमेचा भरणा म्हाडाकडे न केल्यास भूखंड वितरणाचे आदेश रद्द करुन सदरचा भूखंड त्यावरील सर्व बांधकामासह म्हाडाने ताब्यात घ्यावा, असे आदेश पारीत केले आहेत.

---

## पिंपळवाडी पिराची (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील अंगणवाडी उघड्यावर भरत असल्याबाबत

**(६) ३०२८ (०२-०६-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळवाडी पिराची (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील अंगणवाडीचे नऊ वर्षापासूनचे भाडे थकलेले असल्याने येथील अंगणवाडीच्या महिला कर्मचारी बालकांना उघड्यावर पालन, पोषण व आहार वाटपासह शिकवीत असल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून यामुळे बालकांचा सर्वांगिण विकास व शैक्षणिक दर्जा यावर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०५-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) जिल्हा वार्षिक योजना सन २०१८-२०१९ मधून पिंपळवाडी पिराची येथील अंगणवाडी क्र.८ करीता इमारत मंजूर करण्यात आलेली असून, सदर अंगणवाडी इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोविड-१९ नियंत्रणात आणण्याकरीता पॅकेज जाहीर करण्याबाबत

**(७) ३११९ (०२-०६-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विनायकराव मेटे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने कोरोनावर मात करण्याकरीता रुपये १ लक्ष ७० हजार कोटीचे पॅकेज जाहीर केले असून राज्य शासनाने १ रुपयाचेही पॅकेज जाहीर केले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केरळ राज्याने रुपये २०,००० कोटीचे पॅकेज जाहीर केले असताना, महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याने पॅकेज जाहीर न केल्याने, महाराष्ट्रात कोरोना बाधित रुग्णांची संख्या सर्वाधिक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोनाग्रस्त रुग्णांसाठी पॅकेज जाहीर न करता महाविकास आघाडी सरकारचे आमदार व कार्यकर्त्यांसाठी निधी मंजूर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोविड-१९ नियंत्रणात आणण्यासाठी रुपये ४०,००० कोटीचे पॅकेज जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०७-०१-२०२१) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त नागरिकांना आर्थिक मदत देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) मधून कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावास प्रतिबंध करण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या निकषानुसार जिल्ह्यांना निधी वितरित करण्यात आला आहे. आतापर्यंत या प्रयोजनासाठी राज्य आपत्ती निधीमधून एकूण रुपये ८६० कोटी ९२ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाबाबत हाऊसिंग डेव्हलपमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडचा करार रद्द करण्याबाबत

**(८) ३१३२ (२९-०५-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील २४ झोपडपट्टी पुनर्वसनचा करार “एचडीआयएल” कंपनीसोबत करण्यात आला असून सदर कंपनीने अत्यल्प प्रमाणात प्रकल्पाचे काम पूर्ण केल्यामुळे उक्त करार रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेवून सदर कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांद्रे पूर्व येथील भारत नगर झोपडपट्टी पुनर्वसनांतर्गत तेथील पात्र ठरविण्यात आलेल्या रहिवाशांनी घरे रिकामी करुन दिली असता सुरुवातीला कंपनीकडून पर्यायी जागेचे घरभाडे दिले जात होते, परंतु काही कालावधीनंतर घरभाडे मिळणे बंद झाल्यामुळे रहिवाशांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे वारंवार तक्रारी करूनही सदर कंपनीवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्यामुळे परिसरातील ३२ रहिवाशांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेवून सदर प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्याची आणि त्यांना कायमस्वरुपी घरे प्रदान करण्याचे आदेश पारित करण्याबाबतची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दिनांक ११ फेब्रुवारी, २०२० रोजी सुनावणी झाली असता राज्याचे महाधिवक्ता यांनी शासनाने सदर कंपनीवर नोटीस बजावल्याची तसेच कंपनीला दिवाळखोर जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू केल्याची माहिती न्यायालयाला दिली असता न्यायमूर्तींच्या खंडपीठाने सचिव गृहनिर्माण व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने बैठक घेऊन या मुद्द्याबाबत चर्चा करुन तोडगा काढावा असे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या उपरोक्त आदेशानुषंगाने सचिव गृहनिर्माण आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची बैठक संपन्न झाली आहे काय तसेच झोपडीधारकांच्या मागण्यांबाबत कोणकोणते निर्णय घेतले वा घेण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.जितेंद्र आव्हाड (०१-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

मे.एचडीआयएल या विकासकामार्फत १३ झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर असून सद्य:स्थितीत साधारणत: बंद अवस्थेत आहेत. सद्य:स्थितीत विकासकावर दिवाळखोरी जाहीर करण्याची प्रक्रिया एन.सी.एल.टी. (National Company law Tribunal) मार्फत सुरु आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अथवा शासनाकडून सदर कंपनीला अद्यापपर्यंत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली नाही.
(२) व (३) या योजनेतील काही रहिवाशांचे घरभाडे थकीत आहे. विकासक मे.एचडीआयएल यांच्यासोबत झालेल्या ३ नोंदणीकृत कराराच्या आधारे मे.बुधपूर बिल्डकॉन यांनी सदरची योजना त्यांना पूर्ण करण्याचा अधिकार असल्याचे नमूद करुन तसा अर्ज याचिका एल (क्र.२२१७) of २०१९ मध्ये दाखल केला आहे.

विकासक मे.एचडीआयएल यांच्याविरुध्द दिवाळखोरी जाहीर करण्याची प्रक्रिया एन.सी.एल.टी. (National Company law Tribunal) न्यायालयात चालू असल्याची माहिती वकीलांनी मा.न्यायालयात दिलेली आहे.

मा.न्यायालयाने सचिव, गृहनिर्माण व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना बैठक घेऊन योजनेशी संबंधित सर्व मुद्दयांवर चर्चा करुन काय तोडगा काढता येईल याची चाचपणी करावी, असे आदेश दिलेले आहेत.

(४) मा.उच्च न्यायालयातील याचिका (एच) क्र.२११७/२०१९, इस्तारी रमाय्या व इतर विरुध्द मे.एचडीआयएल व इतर या याचिकेमधील दिनांक ११/०२/२०२० रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या दालनात दिनांक २८/०७/२०२० रोजी संयुक्त बैठक संपन्न झालेली आहे. यामध्ये प्रलंबित पुनर्वसन, प्रलंबित भाडे व इतर सर्व मुद्दयांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली असून मे.बुधपूर बिल्डकॉन यांनी प्रलंबित घरभाडे अदा करण्यासाठी एकूण रुपये ६,९१,७०,०००/- चे दोन धनादेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा केलेले आहेत. सदर बैठकीचा इतिवृत्तांत तयार करण्यात आला असून शपथपत्राव्दारे त्या इतिवृत्ताची प्रत मा.न्यायालयाच्या अवलोकनार्थ सादर केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील दहिसर पश्चिमेला लिंक रोड जवळ कांदरपाडा येथील खारफुटीची तोड सुरू असल्याबाबत

**(९) ३२१६ (१०-०६-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दहिसर पश्चिमेला लिंक रोड जवळ कांदरपाडा येथील खारफुटीची तोड सुरू असल्याचे स्थानिक नागरिकांनी दिनांक ५ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वीपेक्षा काही भागात खारफुटीची दाटी कमी झाली असून तेथे जाणाऱ्या लोकांची आणि गाड्यांची संख्या अचानक वाढली व काही वेळा ड्रमची वाहतूक होत असल्याचे ही स्थानिकांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२२-१२-२०२०) :** (१), (२), (३) व (४) मौजे दहिसर पश्चिमेला कांदरपाडा येथे खारफुटीच्या परीसरामध्ये लोकांची व गाड्यांची संख्या अचानक वाढल्याबाबतची बातमी दिनांक ०६/०५/२०२० रोजी महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रातून प्रसिध्द झाली होती.

त्यानुषंगाने महसूल विभागाच्या ताब्यातील क्षेत्राबाबत तहसिलदार, बोरीवली यांनी या जागेची स्थळ पाहणी केली असून, त्यानुसार दलदल, तिवरांची झाडे दिसून येत असून, या ठिकाणी कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून आले नाही. तसेच सदर ठिकाणी गाड्यांची आणि ड्रमची वाहतूक होत नसल्याचे स्थळ पाहणीच्यावेळी निदर्शनास आलेले नाही, असा अहवाल दिला आहे. तसेच वन विभागाच्या ताब्यातील दहिसर व कांदरपाडा येथील अधिसूचित कांदळवन क्षेत्रामध्ये तोड झाल्याचे दिसून आलेले नाही असा अहवाल कांदळवन कक्ष, मुंबई यांनी सादर केला आहे.

---

## खारेकुरण (जि.पालघर) येथे लीज संपूनही मिठागरे सुरू असल्याबाबत

**(१०) ३३०४ (२८-०५-२०२०). श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील खारेकुरण मिठागरांमुळे पंचक्रोशीतील शेतजमिनी, विहिरी, कुपनलिका आदीमध्ये क्षारयुक्त पाणी शिरत राहिल्याने या जमिनी नापीक होऊन पिण्याचे पाणीही क्षारयुक्त झाले असून स्थानिकांनी ज्या मिठागरांची लीज संपली आहेत, त्यांना ती वाढवून देऊ नये यासाठी सन २००९ च्या अगोदरपासून लोकचळवळ सुरु केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिठागरवाल्यांनी उच्च न्यायालयात जाऊन स्थगिती मिळवून पुन्हा मिठागरे सुरू करण्याचे ठरविले असता त्याला मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने मिठागरे बंद करून सदर जमीन शासनाकडे जमा करायला हवी होती असे असतानाही त्याठिकाणी अवैधरित्या मिठागरे सुरु असल्याची बाब निदर्शनास येत आहे तसेच मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा अवमान केल्याप्रकरणी व मुदत संपल्यानंतरही वर्षानुवर्षे मिठागरांचा ताबा सोडलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मिठागरांमुळे पिण्याचे तसेच शेतीचे पाणी खराब झाल्याचा उल्लेख भूजल सर्वेक्षण विभागाने दिनांक २४ जानेवारी, २००५ रोजी वा त्यासुमाराास महसूल विभागाला पाठविलेल्या पत्रात केला होता तसेच मिठागरापासूनचे अंतर पाहता यापुढे मिठागरामुळे भूजल अधिक क्षारयुक्त होईल, असा अहवाल पाठविल्याने हे मिठागर बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खारेकुरण येथील ७०० एकर शासकीय जमिनीवर मीठ उत्पादन करणारी मिठागरे असून या सर्वांचे लीज संपले असल्याने शासनाने या मिठागरांवर कोणती कायदेशीर कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०१-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

खारेकुरण ता.पालघर येथील ग्रामस्थ, ग्रामपंचायत खारेकुरण व लोकप्रतिनिधींनी सन २००४ पासून वेळोवेळी शासन, जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी जव्हार व तहसिलदार पालघर यांच्याकडे निवेदने दिलेली आहेत.

(२), (३), (४) व (५) उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल संरक्षण आणि विकास यंत्रणा, ठाणे यांचेकडील अहवालाच्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावानुसार शासनाने दिनांक ३१/०८/२००९ च्या ज्ञापन अन्वये मौजे खारेकुरण येथील सुमारे ७०० एकर जमिनीवरील मिठागरांचे प्रकल्प बंद करुन जमीन शासन जमा करण्याबाबत आदेश निर्गमित केले. तथापि, मीठ उत्पादनधारकांनी शासनाच्या सदर आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे वेगवेगळ्या याचिका दाखल केल्या असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

## अकोला जिल्हा परिषदेच्या दूधपुर्णा योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(११) ३३२८ (२९-०५-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेने राबविलेली दूधपुर्णा योजना अपयशी झाल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेव्दारा वाटप करण्यात आलेली दुधाळ जनावरे खरेदीत गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुधाळ जनावरे खरेदी प्रकरणातील दोषींवर कारवाई करुन दूधपुर्णा योजना नव्या स्वरुपात अकोला जिल्ह्यात लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (३०-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हा परिषदेमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) ३५१५ (०२-०६-२०२०). श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये गट "अ" व गट "ब" ची पदे (महाराष्ट्र विकास सेवेतील पदे वगळून) वित विभाग, बांधकाम विभाग, सिंचन विभाग, पाणीपुरवठा विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग, कृषी विभाग, शिक्षण विभाग व इतर विभागातील पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी वर्ग-२, उप अभियंता वर्ग-२, उप अभियंता (स्थापत्य) वर्ग-२, तालुका आरोग्य अधिकारी गट-अ, वैद्यकीय अधिकारी गट-ब तसेच पशुधन अधिकारी गट-अ, गट शिक्षणाधिकारी वर्ग-२, मुख्य अध्यापक गट-२, अधीक्षक (राजपत्रित), समाजकल्याण अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी ही पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सार्वजनिक आरोग्य विभागातील पदे रिक्त असल्यामुळे कोविड-१९ या महामारीमध्ये आरोग्य विभागावर मोठ्या प्रमाणात कामाचा ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने हिंगोली जिल्हा परिषदेमधील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (३१-१२-२०२०) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) ग्रामविकास विभागाकडून संबंधित विभागांना व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना, सर्व प्रचलित नियमांचे व शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करुन, जिल्हा परिषद, हिंगोली येथील रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईत मासेमारी पास/परवाना कार्यालय सुरु करण्याबाबत

**(१३) ३५१६ (०२-०६-२०२०). श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४८६३५ ला दिनांक २ जुलै, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, बदलापूर, कर्जत, भिवंडी, मुरबाड तसेच नवी मुंबईतील कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, वाशी व बेलापूर येथील मत्स्यव्यवसाय करणाऱ्या महिलांना फिशिंग पास व फॉर्म नंबर २ घेण्यासाठी

पालघर येथे जावे लागत असून नवी मुंबई ते पालघर हे अंतर प्रवासाच्यादृष्टीने महिलांना खूपच गैरसोयीचे व त्रासदायक होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे नवी मुंबईतच मध्यवर्ती ठिकाणी फिशिंग पासचे कार्यालय उपलब्ध करून द्यावे अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधी व कोळी बांधवांकडून मत्स्यव्यवसाय विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवी मुंबईत मासेमारी पास/परवाने मिळविण्याचे कार्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०१-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) पालघर जिल्हयाच्या निर्मितीनंतर मत्स्यव्यवसाय विभागाचे ठाणे जिल्हा व पालघर जिल्हयासाठी स्वतंत्र जिल्हा कार्यालय निर्माण करणे व सदर कार्यालयासाठी पदनिर्मिती करण्याच्या प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

## राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत

**(१४) ३५७४ (०२-०६-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.जयंत प्रभाकर पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भासह राज्यात माहे एप्रिल-मे, २०२० मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांवर कधी अवकाळी पाउस, गारपीठ तर कधी कोरोना विषाणूजन्य आजारासारखे संकट उद्‌भवल्याने शेतकऱ्यांच्या मालाला कवडी मोल भाव मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यासंदर्भात तसेच शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्याकरीता कृषी पंपाचे वीज बील माफ व कृषी कर्जाला स्थगिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२१-१२-२०२०) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) शेतीपिकांचे पंचनामे करण्यात आलेले असून नुकसानीबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील मीठ उत्पादकांच्या अडचणीबाबत

**(१५) ३७४४ (०२-०६-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील डहाणू, तलासरी, पालघर, वसई तालुक्यात समुद्र किनारपट्टी व खाजण जमिनीत विविध ठिकाणी मिठागरांमध्ये मशागत करून मीठ तयार करण्यात आले असून मीठ उचलण्यासाठी श्रमिक मिळत नसल्याने मीठ उत्पादक अडचणीत आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याआधी अवकाळी पावसामुळे उशिराने मीठ उत्पादन करावे लागल्यामुळे मीठ व्यवसायाला परवानगी द्यावी अशी विनंती ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी संघाने शासनाकडे केली असल्याची बाब माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने परवानगी दिल्यास मीठ उचलण्यास व पाठविण्यास मदत होईल अन्यथा सव्वा महिन्याच्या शिल्लक कालावधीमध्ये नुकसान होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मीठ उत्पादन व्यवसाय सुरू करण्यास शासनाने परवानगी देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०१-०१-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अशी बाब नाही तथापि, कोविड-१९ च्या अनुषंगाने शासनाने जाहीर केलेल्या लॉकडाऊनमुळे मौजे खारेकुरण, ता.जि.पालघर येथील मिठागरात काम करणाऱ्या कामगारांना डहाणू व तलासरी तालुक्यातून आणण्यासाठी परवानगी मिळणेबाबत ठाणे जिल्हा मच्छिमार मध्यवर्ती सहकारी संघाने तहसिलदार, पालघर यांना दिनांक ०६/०५/२०२० रोजी निवेदन दिले आहे. त्यानुषंगाने तहसिलदार, पालघर यांनी दिनांक ०६/०५/२०२० अन्वये सदरहू कामगारांना तलासरी व डहाणू तालुक्यातून आणण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.
(३) व (४) मीठ उत्पादन करणाऱ्या कंपनीस मीठ उत्पादनास व पाठविण्यास परवानगीची आवश्यकता नसल्याचे उप मीठ आयुक्त, मुंबई यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांवगी (मेघे) (जि.वर्धा) पोलीस ठाण्यांतर्गत सेलसुरा शिवारात महिलेवर अत्याचार झाल्याबाबत

**(१६) ४०१७ (१५-०७-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांवगी (मेघे) (जि.वर्धा) पोलीस ठाण्यांतर्गत सेलसुरा शिवारात सहा नाराधमानानी एका विवाहीत महिलेला नोकरीचे आमिष दाखवून तिला व तिच्या पतीला एका फार्महाऊसला बोलावून तिच्या पतीला बाधून महिलेवर अत्याचार केल्याची घटना दिनांक २९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषीं आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२१-१२-२०२०) :** (१) होय, सदर घटना दिनांक २७ जून, २०२० रोजी घडली आहे.
(२) उक्त प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन सावंगी (मेघे) येथे अपराध क्र. २२९/२०२० कलम ३७६ (ड), ३४२, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील नमुद आरोपी क्र. १ ते ६ यांना अटक करण्यात आली असून सध्या आरोपी हे न्यायालयीन कोठडीत आहेत. आरोपींविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून सद्य:स्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पूर्व विदर्भात कोरोना चाचणी तपासणी केंद्र सुरु करण्याबाबत

**(१७) ४१२९ (१७-०७-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: पूर्व विदर्भात नागपूर, भंडारा, चंद्रपूर, वर्धा, गोंदिया व गडचिरोली या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कोरोना विषाणू संसर्गाचे रुग्ण वाढत असून केवळ ८ आरटीपीसीआर मशीनव्दारे कोरोना चाचणी तपासणी होत असल्याचे दिनांक २५ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात विशेषत: विदर्भात चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा ही जिल्हे आदिवासी व नक्षलप्रभावी असून येथील जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक रुग्णालयाची अवस्था दयनीय असल्याने कोरोना विषाणू संसर्ग वाढत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूर्व विदर्भातील रुग्णाची वाढती संख्या लक्षात घेता मा.मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व यवतमाळ येथे कोरोना तपासणी केंद्र सुरु करण्याचे आदेश देवूनही सदर आदेशाचे पालन झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पूर्व विदर्भात कोरोना चाचणी तपासणी मशीन वाढवून तपासणी केंद्र सुरु करण्यासोबत जिल्हा, ग्रामीण व प्राथमिक रुग्णालयात अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०४-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोरोना उद्रेकाच्या सुरुवातीच्या काळात नागपूर मंडळात ८ ठिकाणी आरटीपीसीआर मशीनव्दारे कोरोना चाचणी तपासणी उपलब्ध करण्यात आली होती. त्यानंतर वाढ करुन अतिरिक्त ७ ठिकाणी आरटीपीसीआर मशीनव्दारे कोरोना चाचणी तपासणी सुविधा करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

सध्या पुर्व विदर्भात आय.सी.एम.आर. मान्यता प्राप्त १० शासकीय आणि ५ खाजगी अशा एकूण १५ प्रयोगशाळा कार्यरत आहेत. पुर्व विदर्भातील भंडारा वगळता सर्व जिल्ह्यात प्रयोगशाळा सुरु आहेत. गडचिरोली जिल्हा रुग्णालयात ट्रुनॅट पध्दतीने तपासणी सुरु आहे.

(४) नागपूर मंडळातील सर्व जिल्ह्यात उपरोक्त १५ प्रयोगशाळा व्यतिरिक्त रॅपीड ॲन्टीजेन टेस्ट व्दारेही कोरोना निदान करण्यात येत आहे. तसेच कोरोना रुग्णोपचारासाठी सर्व जिल्हयांमध्ये त्रिस्तरीय रुग्णालय व्यवस्था करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ग्रामपंचायतींच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारती बांधण्याबाबत

**(१८) ४१७० (०९-०९-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण २८ हजार ग्रामपंचायतींपैकी सुमारे ४ हजार २५२ ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू ग्रामपंचायतीच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारती उभारण्याबाबत कोणते नियोजन व तरतूद केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (३०-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही, अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालय इमारत बांधण्यासाठी ग्रामविकास विभागाच्या दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये, मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना सुरू करण्यात आलेली असून दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सदर योजनेच्या प्रचलित धोरणात सुधारणा करण्यात आलेली आहे.

मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत, आतापर्यंत एकूण १,०७४ ग्रामपंचायतींना, त्यांची स्वत:ची ग्रामपंचायत इमारत बांधण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षासाठी सदर योजनेंतर्गत रुपये १५०.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. या योजनेंतर्गत ज्या ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालयाची इमारत अद्याप मंजूर झालेली नाही, अशा या योजनेत पात्र असणाऱ्या उर्वरित ग्रामपंचायतींना निधीच्या उपलब्धतेनुसार, भविष्यात टप्प्या-टप्प्याने मान्यता देण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील धनगरवाड्यांचा विकास न झाल्याबाबत

**(१९) ४१९२ (१४-०९-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव तांडावस्ती दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार लोकसंख्येनुसार अनुदानित रक्कम ठरविण्यात आली असल्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील धनगरवाड्यांच्या विकास लोकसंख्येच्या निकषामुळे होऊ शकलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हा हा डोंगरी जिल्हा असल्याने धनगर समाजासाठी डोंगरी जिल्ह्याचे निकष लावावेत व योजनेच्या अटी व निकष शिथिल करणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (३०-१२-२०२०) :** (१) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग क्र.तांसुयो-२०१७/प्र.क्र.८४/विजाभज-१, दिनांक ३० जानेवारी, २०१८ अन्वये वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेमध्ये दलित वस्ती सुधारणा योजनेच्या धर्तीवर तांडा/वस्ती सुधार योजना सुधारित करण्यात आली असून त्या अंतर्गत लोकसंख्येच्या निकषावर अनुदानाची रक्कम वितरित करण्यात येते.

(२) धनगर समाजासाठी योजना ही आदिवासी विभागाच्या धर्तीवर आहे. त्याला हे निकष लावता येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## न्यु मांडवे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील पर्यायी रस्त्याला संरक्षण भिंत बांधण्याबाबत

**(२०) ४२९४ (१४-०९-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) येथील ग्रामस्थांच्या सातत्याच्या मागणीनुसार न्यु मांडवे ल.पा.यो. येथील पर्यायी रस्त्याला संरक्षण भिंत बांधण्याच्या अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संरक्षण भिंत बांधण्याच्या कामास मान्यता देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०१-०१-२०२१) :** (१) होय.

(२) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

उल्लेखित कामे ही पुनर्वसन नागरी सुविधेमध्ये अंतर्भूत नसल्याने सदर कामांना “विशेष बाब” म्हणून मंजूरी घेण्याबाबत तसेच त्यावर होणारा खर्च प्रकल्प खर्चामधून करण्यासाठीचा प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयाकडून शासनास सादर करण्यात येत आहे. प्रस्ताव मान्यतेनंतर अंदाजपत्रकांना सक्षम स्तरावर तांत्रिक मंजूरी घेऊन सदर कामांचा समावेश प्रस्तावित व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लॉकडाऊन काळात मातंग समाजाला रोजगार मिळणेबाबत

**(२१) ४४८४ (१४-०९-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लॉकडाऊन काळात मातंग समाजातील गोरगरिबांना कसलाच रोजगार मिळाला नाही, त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समाजघटकांना उभारी यावी म्हणून काही योजना शासनाने राबवायचे ठरविले आहे काय,
(३) असल्यास, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळांतर्गत मातंग समाजातील बेरोजगार युवकांना रोजगार मिळावा यासाठी ५० हजारांचे कर्ज देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याची अंमलबजावणी कधी पासून सुरु करण्यात येईल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (३०-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या, मुंबई हे महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम आहे. महामंडळामार्फ़त राज्य तसेच केंद्रीय महामंडळाच्या योजना राबविण्यात येतात. सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षाकरीता शासनाने खालीलप्रमाणे अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर केली आहे.

| अ. क्र. | योजना | अर्थसंकल्पीय तरतूद |
|---|---|---|
| १. | विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजना | १०९.११ कोटी |
| २. | बीज भांडवल योजना | ५.०० कोटी |

उक्त तरतूदीनुसार महामंडळाने जिल्हा कार्यालयांना उद्दिष्ट निश्चित करुन दिली असून उद्दिष्टाप्रमाणे जिल्हा कार्यालयामार्फ़त प्राप्त अर्जानुसार मंजूरी व निधी वितरणाची कार्यवाही सुरू आहे.
(३) विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजनेंतर्गत रुपये ५००००/- प्रकल्प मर्यादा असलेल्या योजनेमध्ये सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाकरीता जिल्हा कार्यालयांना १०,००० कर्ज प्रकरणांचे भौतिक उद्दिष्टे देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बळीराजा चेतना अभियानातील पुस्तके खरेदी कार्यक्रमात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२२) ४५०५ (१४-०९-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष कार्यक्रम या शासनाच्या निर्णयानुसार उस्मानाबाद जिल्ह्याची निवड होऊन त्यासाठी साडेसात कोटींचा निधी प्राप्त झाला होता या निधीतून नॅकॉफ आणि आत्मा यांच्यामार्फत प्रशिक्षण योजना आणि विविध पुस्तके वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या निधीपैकी काही निधी प्रशिक्षणात खर्च होऊन उरलेला निधी पुस्तके वितरणात खर्च करण्यात येणार होता, परंतु सदर पुस्तके किती शेतकऱ्यांना वाटप झाली व कोणत्या शेतकऱ्यांना झाली याबद्दल संदिग्धता असून याबाबत गैरव्यवहार झाला असल्याची तक्रार शेतकरी वर्गाने केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेनुसार बळीराजा चेतना अभियानांतर्गतच्या ६.२५ कोटीच्या पुस्तक खरेदीच्या सर्व व्यवहाराची चौकशी शासनाने केली आहे काय, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२१-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद कार्यालयाच्या दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० च्या आदेशान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक २४/०७/२०२० अन्वये चौकशी अहवाल जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना सादर केला. त्यामध्ये तत्कालीन तहसिलदार (सर्वसाधारण) श्री.अभय मस्के यांच्याकडून कार्यालयीन कामकाजातील प्रशासकीय त्रुटी आढळून आल्या आहेत. त्या अनुषंगाने श्री.मस्के यांच्याविरूध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ नुसार विभागीय चौकशी

करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिनांक २७/०७/२०२० रोजी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद जलसंपदा विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२३) ४५३२ (१७-०७-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जलसंपदा विभागातील १४१ अभियंत्यांसह ९३१ कर्मचारी दिनांक ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले तसेच दरमहा आठशे-नऊशे अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलसंपदा विभागात सद्य:स्थितीत २७०० कनिष्ठ अभियंत्यांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जलसंपदा विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०१-०१-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. औरंगाबाद प्रदेशांतर्गत दिनांक ३१/०५/२०२० रोजी एकूण २७ अभियंते/कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत.
(२) सद्य:स्थितीत जलसंपदा विभागात माहे जून, २०२० अखेर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत) या संवर्गाची एकूण २५५४ इतकी पदे रिक्त आहेत.
(३) वित्त विभागाच्या दिनांक २५ मे, २०१७ परिपत्रकान्वये विभागाचा नवीन आकृतिबंध मंजूर होत नाही. तो पर्यंत गट-क व गट-ड पदे भरतीस निर्बंध आहे. तथापि, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांची सरळ सेवेची भरती करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. त्यानुसार ५०० पदांच्या भरतीबाबत अध्यक्ष, निवड समिती, मुख्य अभियंता (विनिर्दिष्ट प्रकल्प), जलसंपदा विभाग, पुणे यांच्याकडून महापरीक्षा

पोर्टलवर मागणी नोंदविण्यात आली आहे. तथापि, महापरीक्षा पोर्टलला शासनाने स्थगिती दिल्याने सदर भरती होवू शकली नाही.

शासनाचे नवीन धोरणानुसार दिनांक १७/०८/२०२० च्या शासन निर्णयान्वये महाआयटीमार्फत दिनांक २० फेब्रुवारी २०२० च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार Empanelment केलेल्या Vendor च्या यादीतून एका OMR Vendor ची निवड करुन परीक्षा पार पाडाव्यात असे नमूद केले आहे. त्यानुसार परीक्षा घेण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

माहे ऑगस्ट, २०२० अखेर १६४ स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांना कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. त्यापैकी औरंगाबाद विभागात एकूण ६५ कनिष्ठ अभियंत्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खाजगी प्रयोगशाळा व रुग्णालयाच्या संगनमताने रुग्णांची लूट होत असल्याबाबत

**(२४) ४५६८ (१७-०७-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन मान्य खाजगी प्रयोग शाळांकडून सादर होणाऱ्या कोरोना रुग्णांच्या अहवालात सातत्याने सदोष निष्कर्ष काढले जात असल्याच्या प्रकारामुळे खाजगी प्रयोगशाळा आणि रुग्णालयाच्या संगनमतामुळे नाहक कोरोना झाल्याचे भासवून रुग्णांची लूट होत असल्याचा प्रकार माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाण्यातील एका खाजगी प्रयोगशाळेत दिनांक १५ मे २०२० रोजी ४४ कोरोना संशयितांच्या चाचण्या करण्यात आल्या त्यापैकी १२ रुग्णांचे अहवाल सकारात्मक असल्याचे निष्कर्ष या प्रयोगशाळेने काढला मात्र त्यापैकी काही रुग्णांना कोणतेही लक्षणे नसल्याचे ठाणे महानगरपालिका प्रयोगशाळेत केलेल्या फेरतपासणीत स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाच एका शासन मान्य खाजगी प्रयोगशाळेकडून काही चाचणी अहवाल सदोष निष्कर्ष काढले गेल्याचे प्रकरण मुंबई आणि नवी मुंबईत उघडकीस आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०४-०१-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

ठाण्यातील थायरोकेअर या खाजगी प्रयोगशाळेत दिनांक १५/०५/२०२० रोजी ३९ कोरोना संशयितांच्या चाचण्या करण्यात आल्या. यापैकी १२ रुग्णांचे अहवाल पॉझिटिव्ह आल्याचा निष्कर्ष या प्रयोगशाळेने काढला होता. मात्र या १२ पॉझिटिव्ह चाचण्यांची फेरतपासणी ठाणे महानगरपालिकेच्या सी.आ.वाडीया या लॅबमध्ये केली असता १२ पैकी ५ सॅम्पल फेरतपासणी मध्ये निगेटिव्ह आले होते.
(३) होय.

मे.थायरोकेअर डायग्नोस्टिक लिमिटेड यांचेकडून सदोष चाचणी अहवाल प्राप्त झालेला होता.
(४) नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत मे.थायरोकेअर डायग्नोस्टिक लिमिटेड यांना नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाश्यांची चाचणी करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. उक्त प्रकरणी ठाणे महानगरपालिकेने चौकशी केली होती व चौकशीअंती थायरोकेअर लॅबला सॅम्पल घेण्यापासून परावृत्त करण्यात आले होते. तथापि, सदर लॅबने मा.उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका क्र.W.P.ASDB-LCD-VC-८८ of २०२० दाखल करुन महानगरपालिकेने थायरोकेअर लॅबचे म्हणणे एकूण घ्यावे असे आदेश पारित केले. त्यानुसार सुनावणीअंती थायरोकेअर लॅबला “याचिकाकर्ता यांनी पुनश्च: दिनांक २९/०६/२०२० पासून व्यवसाय करण्यास मुभा देण्यात येत आहे. परंतु व्यवसाय करताना भारत सरकार, आय.सी.एम.आर, महाराष्ट्र शासन आणि ठाणे महानगरपालिका यांनी वेळोवेळी दिलेले दिशा निर्देश, नियम, अटी व शर्ती यांचे काटेकोर पालन होऊन व्यवसाय करण्यात यावा. अशी समज देऊन

सॅम्पल घेण्याची परवानगी देण्यात आली. ठाणे महानगरपालिकेच्या सदर समज आदेशाविरुध्द मे.थायरोकेअर लॅबने पुन्हा याचिका क्र. W.P.ASDB-LCD-VC-१९६ of २०२० मा.उच्च नयायालयात दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यात पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत

**(२५) ४५७८ (१५-०७-२०२०). श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ४२१९८ ला दिनांक ४ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्याची व्याप्ती, लोकसंख्या तसेच वाढलेल्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अकोला जिल्ह्यामध्ये पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला शहर पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यासंदर्भात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले आहेत. सदर मुद्दयांची माहिती पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याने सदर मुद्द्यांची माहिती पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वित्त विभागास दिली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अकोला जिल्ह्यात पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२८-१२-२०२०) :** (१), (२) व (३) अकोला जिल्ह्याची व्याप्ती, लोकसंख्या तसेच वाढलेल्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अकोला पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यासाठीचा पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर केला असता पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबतचे सुधारित निकष ठरवण्याबाबत वित्त विभागाने सूचना केल्या आहेत.

वित्त विभागाच्या सूचनेस अनुसरून पोलीस आयुक्त स्थापन करण्याबाबतचे सुधारित निकष निश्चित करून शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर डॉक्टरांना "सुरक्षा कीट" पुरविण्यामध्ये भेदभाव होत असल्याबाबत

**(२६) ४७०२ (१३-०८-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विदेशातून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी सुरू असताना विषाणूपासून डॉक्टरांना वाचविण्यासाठी वैयक्तिक "सुरक्षा कीट" दिली जात असताना त्यात भेदभाव होत असल्याची बाब माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरांना वैयक्तिक "सुरक्षा कीट" घालुन स्क्रिनींग करणे आवश्यक असतानाही सार्वजनिक आरोग्य विभागाने साधे मास्क व हातमोजे दिल्याची बाब निदर्शनास आली असून मध्यरात्रीनंतर विदेशातून विमाने येत असल्याने विमानतळावर ये-जा करण्याकरीता शासनाने शासकीय वाहनाची सोय केली नव्हती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०४-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तांबाडी (ता.रोहा, जि.रायगड) येथील मुलीवर अत्याचार झाल्याबाबत

**(२७) ४७५३ (१८-०८-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तांबाडी (ता.रोहा, जि.रायगड) येथील १४ वर्षीय मुलीवर काही नराधमांनी सामुहिक बलात्कार करुन नंतर तिची हत्या करुन मृतदेह वावळयाचा कोंड या ओहोळाच्या मध्यभागी फेकून दिल्याची घटना दिनांक २६ जुलै, २०२० रोजी घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी दिनांक २७ जुलै, २०२० रोजी रोहा पोलीस ठाण्यात बलात्कार, हत्या व पोक्सी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी जलदगती न्यायालयात खटला चालवून दोषींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी लोकप्रतिनिधी व तेथील ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित गुन्हेगारांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२१-१२-२०२०) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून रोहा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५४/२०२० भादंविसं कलम ३७६ डि ए, ३०२, ३९७, २०१, ३४१ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,६,८ प्रमाणे ०७ आरोपींविरूध्द दिनांक २७/०७/२०२० रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. १ यास दिनांक २७/०७/२०२० रोजी व आरोपी क्र. २ ते ६ यांना दिनांक ३१/०७/२०२० रोजी अटक करण्यात आली. नमुद गुन्ह्यातील आरोपी क्र. १, २, ३, ५ व ६ हे पाच आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपी क्र. ४ व ७ हे दोन आरोपी विधी संघर्षीत बालक असल्याने मा.न्यायालयानी दिलेल्या आदेशानुसार त्यांना बालसुधारगृह, कर्जत येथ निगराणीखाली ठेवले आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झालेला असून मा.न्यायालयात आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. सदर खटला जलदगती न्यायालयात चालविण्याबाबत मा.उच्च न्यायालयास विनंती करण्यात आली असून सद्य:स्थितीत सदर खटला न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील गिरण्यांच्या जागेवरील सदनिकाकरीता काढण्यात येणाऱ्या सोडतीवरील स्थगिती उठविण्याबाबत

**(२८) ४८३२ (२०-११-२०२०). श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गिरणी कामगार व त्यांच्या वारसांसाठी बॉम्बे डाईंग (स्प्रिंग मिल) व श्रीनिवास मिलच्या जागेवर बांधलेल्या ३९८४ सदनिकांची सोडत (Lottery) दिनांक १ मार्च, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री यांचे उपस्थितीत मुंबई येथे काढण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडा आणि शासनाने सदर सोडत (Lottery) काढताना मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये स्थापन केलेल्या नियंत्रण समितीच्या (Monitoring committee) कागदपत्राची छाननी व कामगारांची यादी प्रसिध्द

करण्याचा कालावधी याबाबतच्या नियमांचा भंग केल्याने नियंत्रण समितीने सोडत प्रक्रियेस स्थगिती दिली असल्याचे दिनांक ४ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त स्थगित करण्यात आलेली सोडत पुन्हा काढण्याबाबत शासनाचे नियोजन काय आहे तसेच सदनिकेची मूळ किंमत व शासनाने आर्थिक सवलत दिली असल्यास सदर सदनिकेची किंमत किती असणार आहे तसेच सदर सदनिका सवलतीच्या दराने दिल्यामुळे त्याचा किती आर्थिक भार शासनावर पडणार आहे व तो कोणत्या मार्गाने भरुन काढण्याचे शासनाचे प्रयोजन आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.जितेंद्र आव्हाड (३१-१२-२०२०)** : (१) मुंबईतील गिरणी कामगार व त्यांच्या वारसांसाठी बॉम्बे डाईंग (स्प्रिंग मिल) व श्रीनिवास मिलच्या जागेवर बांधलेल्या ३८९४ सदनिकांची सोडत दिनांक १ मार्च, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री महोदयाचे उपस्थितीत मुंबई येथे काढण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) बॉम्बे डाईंग मिलच्या जागेवर बांधण्यात आलेल्या सदनिकांसाठी प्रति सदनिका विक्री किंमत रुपये १८.१४ लक्ष व श्रीनिवास मिलच्या जागेवर बांधण्यात आलेल्या सदनिकांसाठी प्रति सदनिका विक्री किंमत रुपये १७.३३ लक्ष एवढी म्हाडाकडून निश्चित करण्यात आली होती. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या दिनांक २७/०२/२०२० रोजी झालेल्या बैठकीत सदरहू सदनिकांची प्रति सदनिका विक्री किंमत रुपये ९.५० लक्ष एवढी निश्चित करण्यात आली. सदरहू बैठकीत म्हाडाने निश्चित केलेली विक्री किंमत व समितीने निश्चित केलेली विक्री किंमत या किंमतीमधील फरकाची रक्कम रुपये ३३२.०३ कोटी निधी शासनाने म्हाडास निवारा निधीमधून उपलब्ध करुन देण्यास समितीने मान्यता दिलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चौल-आग्राव (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत मंजूर झालेल्या रस्त्याच्या कामाबाबत

**(२९) ४८५३ (२०-११-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौल-आग्राव (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत मंजूर झालेल्या रस्त्याच्या कामाची मुदत संपूनही ठेकेदाराने काम सुरु केले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेकेदाराच्या अनागोंदी कारभारामुळे हजारो गावकऱ्यांना वर्षानुवर्षे खड्यातून ये-जा करावी लागत असल्यामुळे सदर रस्त्याची कामे तात्काळ व्हावी याकरीता चौलकरांनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे विनंती करुनही ठेकेदार दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जबाबदार ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (३०-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे विनंती केल्याचे निवेदन आढळून आले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सानपाडा (नवी मुंबई) गार्ड बोर्डमधील सुरक्षारक्षक कामाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(३०) ४८९३ (२३-११-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुरक्षारक्षकांच्या नोकरीचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र खाजगी सुरक्षारक्षक अधिनियम १९८१ कायदा लागू करण्यात आला, त्यानुसार महाराष्ट्र खाजगी सुरक्षा सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीच्या सन २००६ च्या निर्णयानुसार शासकीय, निमशासकीय कार्यालय, महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था आदि ठिकाणी महामंडळाकडूनच सुरक्षारक्षक घ्यावेत असे बंधनकारक करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही अपवाद वगळता बहुतांश शासकीय कार्यालयांनी खाजगी एजन्सीकडून सुरक्षारक्षक घेतले असल्याचे निदर्शनास आले असून त्यामुळे मंडळाकडे नोंदणी केलेले सानपाडा (नवी मुंबई) गार्ड बोर्ड मधील २००० सुरक्षारक्षक गेल्या अनेक महिन्यापासून कामाच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुरक्षारक्षकांना काम मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२९-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, महाराष्ट्र खाजगी सुरक्षारक्षक (नोकरीचे नियमन आणि कल्याण) अधिनियम १९८१ अन्वये राज्यात १५ सुरक्षारक्षक मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच शासनाच्या दिनांक ८/११/२००६ च्या निर्णयानुसार शासकीय, निमशासकीय कार्यालय, महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था आदि ठिकाणी महामंडळाकडून सुरक्षारक्षक घ्यावेत असे बंधनकारक करण्यात आले आहे.

(३) व (४) हे अंशतः खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक ८/११/२००६ नुसार बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील शासकीय/निमशासकीय कार्यालयामध्ये ८६३७ सुरक्षारक्षक कार्यरत आहेत. बहुतांशी शासकीय/निमशासकीय कार्यालयामध्ये महामंडळाकडील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वितरण करण्यात आलेली असून मंडळातील क्षेत्रिय निरीक्षकामार्फत खाजगी सुरक्षारक्षक नेमणाऱ्या विविध आस्थापनांना भेटी देण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र खाजगी सुरक्षारक्षक (नोकरीचे नियमन आणि कल्याण) अधिनियम १९८१ व महाराष्ट्र खाजगी सुरक्षारक्षक (नोकरीचे नियमन आणि कल्याण) योजना २००२ मधील तरतूदींचा भंग करणाऱ्या आस्थापनावर मंडळामार्फत खटले दाखल करण्यात आलेले असून सद्य:स्थितीत एकूण ४४६ खटले न्यायप्रविष्ट आहेत. त्यापैकी ३ खटले शासकीय व निमशासकीय आस्थापनेवर दाखल करण्यात आलेले आहेत.

तसेच मंडळाच्या नोंदीत मुख्य मालकीची सुरक्षारक्षक पुरवठा करण्याच्या मागणी घट झालेली असल्यामुळे सुरक्षारक्षक प्रतिक्षेच्या यादीत आहेत. जिल्हा सुरक्षारक्षक मंडळ मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे एकूण २७६०१ नोंदीत सुरक्षा रक्षकापैकी ४४९४ सुरक्षारक्षक प्रतिक्षा यादीवर आहेत. प्रतिक्षा यादीवरील नोंदीत सुरक्षा रक्षकांना ज्येष्ठतेनुसार व आस्थापनांच्या मागणीनुसार सुरक्षारक्षक वितरित करण्याची कार्यवाही मंडळ स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नालासोपारा (पूर्व) येथे अवैध चाळी व व्यावसायिक गाळयांचे बांधकाम सुरु असल्याबाबत

**(३१) ५०३३ (१३-११-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिका के-प्रभाग समिती एफ अंतर्गत नालासोपारा (पूर्व) येथील बिलालपाडा, मालजी पाटील महानगर, मौजे बिलालपाडा सर्व्हे नं. २०, हिस्सा नं. ०२ येथे मोठ्या प्रमाणात अवैध चाळी व व्यावसायिक गाळयांचे बांधकाम करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नालासोपारा येथील तथाकथित विकासक विजय सिंह, अखिलेश सिंह यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करुन शासकीय जमिनी बळकावून अवैधरित्या चाळी व व्यावसायिक गाळे बांधले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनधिकृत/अवैध बांधकामाबाबत अनेक तक्रारी प्राप्त होवूनही संबंधित विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने पाहणी/चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासनस्तरावर अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०१-२०२१) :** (१) वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती (एफ), मौजे बिलालपाडा, सर्व्हे नं. २० मध्ये अनधिकृत व्यावसायिक गाळे व रहिवासी चाळी असे अंदाजित १८,८०० चौ. फुटाचे अनधिकृत बांधकाम अस्तित्वात असल्याची वस्तुस्थिती वसई-विरार महानगरपालिकेनी कळविली आहे.
(२) व (३) सदरचे अनधिकृत बांधकाम विकासक विजय सिंह व अखिलेश सिंह यांच्यामार्फत सक्षम प्राधिकरणाची कोणतीही परवानगी न घेता करण्यात आल्याचे वसई-विरार महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, सदर जागेच्या दप्तर नोंद वहीवरुन व सात बारा उताराच्या नोंदीवरुन ही खाजगी स्वरुपाची असून विठाबाई पाटील यांच्या मालकीची आहे.

मौजे बिलालपाडा सर्व्हे नं. २० या जागेतील अनधिकृत बांधकामे हे जुने असून सदर ठिकाणी रहिवास वापर सुरु असल्याने सदरचे बांधकाम निष्कासित करण्यात आली नसल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेनी कळविली आहे.

सदरच्या अनधिकृत बांधकामांना दिनांक १८/११/२०२० रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदी अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे.

दरम्यान वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामाच्या वाढत्या तक्रारी लक्षात घेऊन दिनांक ०८/१०/२०२० रोजी मा.राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रित करण्यासाठी व निर्मुलनासाठी दिनांक ०२/०३/२००९ च्या शासन निर्णयातील सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील वरळी स्मशानभूमी येथे माता रमाई स्मारक उभारण्याबाबत

**(३२) ५०४९ (२०-११-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वरळी स्मशानभूमी येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी माता रमाई यांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाकडून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त रुपये १.०० कोटी इतका निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२० दरम्यान दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या बैठकीमध्ये मा.नगर विकास मंत्री यांनी सदर स्मारकाचा आराखडा तयार करून स्मारक उभारण्यासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या देऊन सुसज्ज स्मारक उभारण्यात येईल असे निश्चित केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.नगर विकास मंत्री यांच्या निर्देशानुसार आराखडा तयार करण्यात आला आहे काय तसेच स्मारकाकरीता लागणाऱ्या सर्व परवानग्या प्राप्त झाल्या आहेत काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वरळी स्मशानभूमी येथे जलदगतीने माता रमाई स्मारक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका सदर जागा विकास नियमावली-२०३४ नुसार हिंदू स्मशानभूमी/विद्युत स्मशानभूमी तसेच प्रार्थनास्थळ इत्यादी संलग्न वापरासाठी विकसित करण्यात येऊ शकते अशी माहिती मा.विधानपरिषद सभापती महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७/०२/२०२० रोजी घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आली होती.

माता रमाबाई आंबेडकर स्मशानभूमीमध्ये अस्तित्वात असलेल्या माता रमाई यांच्या पुतळ्याच्या ठिकाणी सुशोभिकरण, भाविकांना बसण्याची सोय व पुतळ्याचे ऊन व पाऊस यापासून संरक्षण करण्यासाठी फायबरचे छत इत्यादी बांधकाम करण्यात यावे असे आदेश मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.नगर विकास मंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी सदर बैठकीमध्ये दिले होते.
(४) व (५) माता रमाई यांच्या पुतळ्याच्या ठिकाणी सुशोभिकरण, भाविकांना बसण्याची सोय व पुतळ्याचे ऊन व पाऊस यापासून संरक्षण करण्यासाठी फायबरचे छत इत्यादी बांधकाम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित असून, प्रशासकीय मंजुरी घेण्यात आली आहे.

---

## मुंबई महानगरपालिकेने आरोग्य अर्थसंकल्पातील निधीचा विनियोग केला नसल्याबाबत

**(३३) ५०५३ (१३-११-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने गत तीन वर्षात महापालिकेच्या आरोग्य अर्थसंकल्पातील तब्बल ७३ टक्के निधी वापरलाच नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून एका खाजगी सामाजिक संस्थेच्या अहवालानुसार रुग्णालयांचे आणि आरोग्य केंद्रांचे नामकरण करण्याला महापालिकेच्या आरोग्य विभागाने सर्वाधिक प्राधान्य दिल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका रुग्णालयामध्ये वैद्यकीय कर्मचाऱ्यांची ४७ टक्के पदे आणि पॅरामेडीकलची ४३ टक्के पदे रिक्त असून एकूण रिक्त पदांचे प्रमाण ३० टक्के असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबई सारख्या आंतरराष्ट्रीय शहराची आरोग्य यंत्रणा अद्यावत करून शहरातील नागरिकांना सुसज्ज आरोग्य व्यवस्था पुरविण्यासाठी तसेच रिक्त पदे भरण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये वैद्यकीय कर्मचाऱ्यांची आणि पॅरामेडिकलची साधारणत: २०% ते २५% पदे रिक्त आहेत.

तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार खुल्या प्रवर्गाच्या कोट्यातील पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु असून, मागास प्रवर्गातील पदे पदोन्नतीने भरता येत नसल्याने काही पदे रिक्त आहेत.

तसेच रुग्णालयांची निकड लक्षात घेता, पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांची रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहेत.

---

## ठाणे शहरातील जनसेवा केंद्र, साईसेवा हेल्थ सेंटर व मातोश्री आरोग्य केंद्र रुग्णालये सिल करण्याबाबत

**(३४) ५१५१ (१३-११-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील कळवा प्रभाग समितींतर्गत वाघोबानगर व भास्करनगर येथील जनसेवा केंद्र, साईसेवा हेल्थ सेंटर, मातोश्री आरोग्य केंद्र यांचा परवाना महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिनांक १८ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास रद्द केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित तिन्ही रुग्णालये सिल करण्याबाबत आरोग्य विभागाकडून मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांना पत्र देण्यात येवूनही रुग्णालयांवर कोणतीही कारवाई झाली नसल्यामुळे सदर रुग्णालयांवर नियमानुसार सिल करण्याची कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर मतदार संघ) यांनी आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना दिनांक २० ऑगस्ट, २०२० रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनानुसार सदर तिन्ही रुग्णालय सिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०१-२०२१) :** (१) ठाणे शहरातील कळवा प्रभाग समितींतर्गत वाघोबानगर व भास्करनगर येथील जनसेवा केंद्र, साईसेवा हेल्थ सेंटर, मातोश्री आरोग्य केंद्र या रुग्णालयांचा परवाना ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने दिनांक ०५/०२/२०२० रोजी रद्द केला होता.

(२) व (३) ठाणे महानगरपालिकेकडे दिनांक २०/०८/२०२० रोजीचे पत्र प्राप्त झाले नसल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे महानगरपालिकेने जनसेवा केंद्र, साईसेवा हेल्थ सेंटर, मातोश्री आरोग्य केंद्र या रुग्णालयास दिनांक २६/०८/२०२० रोजी सिल केले होते.

तथापि, दिनांक ०७/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर रुग्णालयाचे सिल विविध अटी व शर्तीच्या अधीन राहून काढण्यास ठाणे महानगरपालिकेने मान्यता दिली आहे. मात्र सदर दवाखान्यास व्यावसायिक परवानगी देण्यात आली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई-विरार महानगरपालिकेची (जि.पालघर) परिवहन सेवा निकृष्ट कारभारामुळे बंद असल्याबाबत

**(३५) ५२६६ (१३-११-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिकेची (जि.पालघर) परिवहन सेवा निकृष्ट कारभारामुळे बंद स्थितीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्या रेल्वे सेवा उपलब्ध नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याने परिवहन सेवा तत्काळ सुरु होण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांना दिनांक ५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने वसई-विरार येथील नागरिकांना तात्काळ परिवहन सेवा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०१-२०२१) :** (१) वसई-विरार शहर महानगरपालिकेची परिवहन सेवा माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये बंद असल्याची वस्तुस्थिती वसई-विरार शहर महानगरपालिकेनी कळविली आहे.
(२) व (३) वसई-विरार शहरातील नागरिकांना परिवहन सेवेच्या निकृष्ट कारभारामुळे होणाऱ्या त्रासाच्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात राज्य परिवहन मंडळाची सेवा चालू करण्याकरीता वसई-विरार क्षेत्रातील स्थानिक

लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबरमध्ये आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांना निवेदन दिले असल्याची वस्तुस्थिती आहे.

तसेच उक्त निवेदनाच्या अनुषंगाने वसई-विरार महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळासमवेत पत्र व्यवहार करण्यात आला आहे. राज्य परिवहन महामंडळाने सदर सेवा रुपये ७५ प्रती किलोमीटर या दराने भाडे तत्वावर सुरु करता येणार असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, बस भाडेतत्वावर घेणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसल्याने महानगरपालिकेने BOOM तत्वावर बससेवा सुरु करण्याकरीता ई-निविदा प्रक्रिया सुरु केली आहे. तसेच महानगरपालिकेने प्रशासकीय ठरावाव्दारे निविदा मंजूर केली असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, माहे डिसेंबर, २०२० अखेरपर्यंत किंवा त्यापूर्वी परिवहन सेवा पुर्ववत करण्याचे नियोजित असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजवली (ता.वसई) येथे परिवहन आगार उभारण्याचे कंत्राट खाजगी ठेकेदारास दिल्याबाबत

**(३६) ५४६८ (१३-११-२०२०). श्री.रविंद्र फाटक, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजवली (ता.वसई) येथे परिवहन आगार उभारण्याचे कंत्राट वसई-विरार शहर महानगरपालिका प्रशासनाने मे.एन.ए.कंन्स्ट्रक्शन या खाजगी ठेकेदारास सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले असून उक्त परिवहन आगार उभारण्यात येणारी जागा ही सागरी नियंत्रण क्षेत्रामध्ये येत असल्याची बाब कालांतराने निदर्शनास आल्यामुळे सदर कामास स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगाराचे बहुतांशी काम पूर्ण झाले असल्यामुळे संबंधित ठेकेदाराने महानगरपालिका प्रशासनाकडे मागितलेल्या रुपये ६ कोटी इतक्या रकमेच्या नुकसान भरपाई पैकी रुपये ३ कोटी इतकी नुकसान भरपाई महानगरपालिकेमार्फत संबंधित ठेकेदारास अदा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कसलीही चाचणी न करता, बेजबाबदारपणे आणि अगदी घाईगडबडीत सदर कामाचे कंत्राट ज्या अधिकाऱ्यांनी मंजूर करुन देयके अदा केली त्यांची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत दिनांक १० जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.पालकमंत्री महोदयांकडे एका सविस्तर लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रकरणी दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०१-२०२१)** : (१) वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्या परिवहन सेवा उपक्रमाकरीता जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान योजना सुविधा प्रकल्प उभारणी अंतर्गत वसई (पुर्व) येथील राजवली व वसई (पश्चिम) येथील यशवंत नगर येथे बस डेपो बांधकामाच्या एकूण रुपये ८७.४४ कोटीच्या प्रकल्पास सन २०१३ मध्ये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली होती. तसेच सदर कामाचा सन २०१५ मध्ये प्रत्यक्ष कार्यादेश देण्यात आला आहे.

तथापि, राजवली येथील सर्व्हे नं. ७५, ७६, ७८, ७९, १८५, १९० ही जागा बस डेपोसाठी आरक्षित होती परंतु सदर जागा सी.आर.झेड. ने बाधित असल्याचे कालांतराने निदर्शनास आल्याने सदर काम रद्द करण्यात आल्याची वस्तुस्थिती वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(२) बस डेपो बांधकामाचे कंत्राटदार मे.एन.ए. कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. कंपनी यांनी राजवली बस डेपोचे काम सुरु न झाल्यामुळे व यशवंत नगर येथील काम उशिरा सुरु झाल्यामुळे रुपये ६.४९ कोटीच्या नुकसान भरपाईची मागणी केली होती.

तथापि, निविदेमधील असणाऱ्या तरतुदीन्वये सेवानिवृत्त सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची डिस्पुट ॲडज्युडीकेशन बोर्ड म्हणून नियुक्ती करण्यात आली सदर बोर्डाने कंत्राटदाराने सादर केलेल्या मागणीच्या प्रस्तावाची छाननी करुन जागा हस्तांतरण विलंबामुळे बँक गॅरंटी, इंन्शुरन्स, मनुष्यबळ यांच्याबाबत वाढीव खर्चाचा परतावा तसेच राजवली येथील न सुरु झालेल्या कामापोटी असे एकूण रुपये ३.६८ कोटी रकमेची भरपाई ठेकेदारास अनुज्ञेय असल्याचे निर्देशित केल्याने त्यानुसार ठेकेदारास नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात आली असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नियोजन शुन्य कारभारामुळे रुपये ३ कोटी इतक्या रकमेचे नुकसान झाल्याबाबत तक्रार या विभागास प्राप्त झाली आहे. सदरची तक्रार आवश्यक त्या नियमोचीत कार्यवाहीकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेस दिनांक ०५/०२/२०१९ च्या पत्रान्वये अग्रेषित करण्यात आली आहे.

सदर प्रकरणात प्रकल्प मंजुरी देताना विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करणे तसेच अंमलबजावणी करताना महानगरपालिकेस झालेल्या आर्थिक नुकसानीच्या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधित कागदपत्रांची तपासणी करावी व तथ्य आढळल्यास त्याप्रमाणे आवश्यक ती नियमोचीत कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मनोर व नांदगाव (जि.पालघर) येथे वारली हाट उभारण्याचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत

**(३७) ५४८४ (२०-११-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर व नांदगाव (जि.पालघर) येथे पर्यटन विभागाच्या जागेवर वारली हाट उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास रुपये ५७ कोटी ८५ लाख निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकाम अतिशय संथगतीने सुरु असल्याने शासनाचे आर्थिक नुकसान होत असल्यामुळे सदर बांधकाम जलदगतीने होण्याकरीता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२९-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

सदर कामासाठी रुपये ५७.८५ कोटी रकमेची प्रशासकीय मान्यता प्राप्त असून या प्रकल्पाचा निधी त्यासाठी गठीत “वारली हाट विकास समिती” यांचेकडे वितरित करण्यात येतो. सदर निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध नाही.
(२) व (३) बांधकामासाठी आवश्यक जागा सार्वजनिक बांधकाम विभागास सप्टेंबर, २०१९ मध्ये उपलब्ध करुन दिल्यानंतर कामास सुरुवात करण्यात आली असून सद्य:स्थितीत २४ इमारतींपैकी १० इमारतीचे काम तसेच संरक्षण भिंत व इतर अनुषंगिक कामे प्रगतीत आहेत. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीमुळे काही कालावधीसाठी काम बंद होते परंतु सद्य:स्थितीत प्रकल्पाचे काम सुरु असून निधी उपलब्धतेनुसार सदर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## आदिवासी विकास विभागाच्या पाच प्रकल्पात कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या नावे अपहार झाल्याबाबत

**(३८) ५४८९ (२३-११-२०२०). श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीमंत महाराज महादेवराव व सिधिंयाजी फाऊंडेशन, जाणता राजा चॅरिटेबल ट्रस्ट (जि.औरंगाबाद) आणि लोहारा (जि.परभणी) येथील क्रांतीज्योती प्रमिलाजी चव्हाण महिला मंडळ या संस्थेने अप्पर आदिवासी विकास आयुक्त, अमरावती अंतर्गत धारणी, पुसद, औरंगाबाद, किनवट व कळमनुरी या पाच प्रकल्पात आदिवासी युवक, युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षणात सन २०१२ ते २०१६ या कालावधीत ६१३ प्रशिक्षणार्थींची बनावट यादी, आदिवासी युवक-युवकींना खोटे प्रशिक्षण स्थळ दाखवुन कौशल्य विकास प्रशिक्षण ही योजना केवळ कागदोपत्री राबवून १ कोटी ९५ लाख ८२ हजार १३३ रूपयांचा अपहार झाल्याचे दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक येथील आयुक्त तसेच अमरावतीचे अपर आयुक्त यांनी फौजदारी कारवाई करावी अशा सूचना अगोदरच प्रकल्प अधिकाऱ्यांना पत्राव्दारे दिलेल्या असतानाही औरंगाबाद व किनवट येथील प्रकल्प अधिकाऱ्यांनी अपहाराचे प्रकरण पोलिसात देण्यासाठी कोणतीही कारवाई केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपहार करणारी संस्था एकच असताना तीन वेगळे अध्यक्ष, सचिव असल्याची बाब चौकशी समितीच्या निदर्शनास येऊन संस्थेची देयके काढताना अधिकारी कर्मचाऱ्यांचे संगनमत असल्याचे स्पष्ट होवुनही त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रशिक्षणाच्या नावे सुमारे २ कोटी रूपयांच्या अपहार प्रकरणी जाणीवपूर्वक संबंधितांनी कारवाई न केल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या अपहार प्रकरणी संबंधित संस्था तसेच संबंधित अधिकाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (३१-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जाणता राजा चॅरीटेबल ट्रस्ट, परभणी, क्रांतीज्योती प्रमिलाबाई चव्हाण महिला मंडळ, परभणी व श्रीमंत महाराज माधवराव सिंधियाजी फाऊंडेशन, सिध्दिविनायक रेसिडेन्सि, नाथपुरम, पैठणरोड, औरंगाबाद या

संस्थांनी वॉर्डबॉय प्रशिक्षण, हॉटेल मॅनेजमेंट प्रशिक्षण, हॉस्पिटल मॅनेजमेंट प्रशिक्षण, रिटेल मार्केटिंग, इलेक्ट्रिक फिटिंग इत्यादी योजना राबविताना खोटे दस्ताऐवज तयार करुन रुपये १,९५,८२,१३३/- (अक्षरी रुपये एक कोटी पंच्याण्णव लक्ष ब्याऐंशी हजार एकशे तेहतीस) एवढ्या रकमेची अनियमितता केल्याची बाब अपर आयुक्त, अमरावती यांनी सादर केलेल्या अंतरीम चौकशी अहवालानुसार निदर्शनास आली आहे.

(२), (३), (४) व (५) आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांचे कार्यालयाचे दिनांक ०१/१०/२०२० रोजीचे व अपर आयुक्त, अमरावती यांचे कार्यालयाचे दिनांक २३/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांना फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. परंतु, सदर प्रकरणात संबंधित असलेल्या संस्थांनी आयुक्तालयाकडे तसेच शासनाकडे फौजदारी कार्यवाही करण्यापूर्वी बाजु मांडण्याची संधी देण्याबाबत विनंती केली होती. त्यानुषंगाने सदर प्रकरणी शासनाचे दिनांक २२/१०/२०२० रोजीचे पत्रान्वये अंतरिम चौकशी अहवालाचे अनुषंगाने संबंधित संस्थेस व संबंधित अधिकाऱ्यांस म्हणणे मांडण्याची व त्यानुसार संस्थेवर तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांनी दिनांक २७/१०/२०२० रोजीचे पत्रान्वये अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांना सदर प्रकरणी सुनावणी कागदपत्रांची तपासणी करुन संबंधित संस्था व अधिकारी यांची सुनावणी घेण्याबाबत कळविण्यात आले असून अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचेस्तरावर याबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर सुनावणीस अनुसरुन पुढील कारवाई करण्यात येईल.

---

## पनवेल महानगरपालिका (जि.रायगड) येथे कार्यरत अधिकारी/कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(३९) ५५४८ (१३-११-२०२०). श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका (जि.रायगड) येथे कार्यरत अधिकारी/कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा सविस्तर प्रस्ताव आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचेकडून शासनाच्या नगर विकास विभागास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल महानगरपालिकेस दिनांक ०७ सप्टेंबर, २०१९ रोजी नगर विकास विभागाकडून प्राप्त पत्राच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या महसूली उत्पन्न व खर्च तसेच वित्तीय दायित्व इ. माहिती विहित प्रपत्रात दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी शासनास सादर करण्यात आली असून पनवेल महानगरपालिकेकडून शासन निर्णयात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे पनवेल महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचना दिनांक ०१ जानेवारी, २०१६ रोजीपासून लागू करण्यास मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०१-२०२१)** : (१) व (२) सातवा वेतन आयोग महानगरपालिकेस लागू करण्याबाबतची कार्यपध्दती तसेच अटी व शर्ती शासन निर्णय, दिनांक २९/०८/२०१९ रोजी विभागाने निर्गमित केल्या आहेत.

तद्नुषंगाने पनवेल महानगरपालिकेने सातवा वेतन आयोग लागु करण्याबाबतचा प्रस्ताव, दिनांक २९/०८/२०१९ च्या शासन निर्णयाव्दारे विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार आवश्यक माहितीसह शासनास सादर केला होता.

तद्नंतर शासनाच्या मंजुरीनंतर पनवेल महानगरपालिकेसाठी सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबतचा शासन आदेश विभागाने दिनांक १४/१०/२०२० रोजी निर्गमित केला आहे.

पनवेल महानगरपालिकेने अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/१०/२०२० पासून सातवा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन अदा केले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार महानगरपालिका (जि.पालघर) हद्दीत अधिकृत बांधकामे सुरु असल्याबाबत

**(४०) ५५८९ (२०-११-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिका (जि.पालघर) हद्दीत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम होत असल्यामुळे नागरिकांची फसवणूक होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.नगर विकास मंत्री यांस निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०१-२०२१) :** (१) व (२) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम सुरू असल्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले होते.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर महानगरपालिका हद्दीमध्ये ऑक्टोबर, २०२० पर्यंत १२५७४ अनधिकृत बांधकाम असल्याची बाब वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर महानगरपालिका व विभागाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे :-

- सदर क्षेत्रात महानगरपालिका स्थापनेपूर्वी “सिडको नियोजन प्राधिकरण” होते. सदर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अनधिकृत इमारती बांधण्यात आल्या असल्याची वस्तुस्थिती आहे.

- माहे ऑक्टोबर, २०२० पर्यंत एकूण १२५७४ अनधिकृत बांधकामापैकी ६४६१ बांधकामांना नोटीसा देण्यात आल्या आहेत.
- सदर बांधकामांपैकी ४८३ बांधकामधारकांवर (MRTP) अंतर्गत विविध पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल केले आहेत. तसेच फौजदारी कायद्यान्वये ११४ बांधकामधारकावर फसवणूकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
- तसेच ११०९६ बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे.
- सदर अनधिकृत बांधकामांना मा.न्यायालयाकडून कोणत्याही स्वरुपाची स्थगिती आदेश मिळू नये याकरीता महानगरपालिकेच्या पॅनलवर असलेल्या वकिलांतर्फे कॅव्हेट दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येते.
- तसेच महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम / अतिमक्रमणाच्या वाढत्या तक्रारीच्या अनुषंगाने विभागाच्या दिनांक ०२/०३/२००९ च्या शासन निर्णयातील सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश महानगरपालिकेस दिले आहेत.
- तसेच महानगरपालिका अधिनियमानुसार व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम (MRTP) कायद्यांतर्गत अनधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई करण्याबाबत दिनांक ०३/०५/२०१८ च्या शासन परिपत्रकान्वये कार्यवाही करण्याच्या सूचना महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात संस्थांतर्गत आदिवासी आश्रमशाळांना प्रती विद्यार्थी पाच हजार रुपये मिळणेबाबत

**(४१) ५७२५ (२३-११-२०२०). डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.प. २ (५३)

(१) राज्यात संस्थांतर्गत चालविण्यात येणाऱ्या आदिवासी आश्रमशाळांना विद्यार्थी खर्च अतिशय कमी म्हणजे पाचव्या वेतन आयोगानुसार १२% दिला जातो व त्यामध्ये विद्यार्थी खर्च भागविणे शाळा व्यवस्थापनास शक्य होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळांना विद्यार्थी खर्च हा प्रती विद्यार्थी दरवर्षी रुपये पाच हजार मिळावे अशी मागणी वारंवार आदिवासी आश्रमशाळा संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थी खर्च दरवर्षी प्रती विद्यार्थी प्रमाणे रुपये पाच हजार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०५-०१-२०२१) :** (१) आदिवासी विकास विभागाच्या दिनांक ३१/०५/२०१६ च्या शासन निर्णयान्वये विभागांतर्गत राज्यातील प्राथमिक व माध्यमिक अनुदानित आदिवासी आश्रमशाळांच्या शाळा व वसतिगृह विभागांना आकस्मिक वेतनेत्तर अनुदान (८ टक्के व १२ टक्के) कर्मचाऱ्यांच्या पाचव्या वेतन आयोगानुसार परिगणना करून सन २०१६-२०१७ या वर्षापासून देण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अनुदानित आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांकरीता प्रती विद्यार्थी प्रती वर्ष रुपये ५०००/- व अनिवासी विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी प्रती वर्ष रुपये ३०००/- प्रमाणे आकस्मिक अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव जुलै, २०१९ मध्ये सादर केला असता त्यावर वित्त विभागाने राज्यात काही भागात दुष्काळ व काही भागात पुर परिस्थिती याकरीता विविध सवलती व नुकसान भरपाईसाठी येणारे मोठे दायित्व या बाबींचा साकल्याने विचार करता सदर प्रस्ताव तुर्तास पुढे ढकलणे योग्य राहिल असे अभिप्राय सप्टेंबर, २०१९ मध्ये दिले होते. सध्या राज्यात कोरोनामुळे निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थितीमुळे सदर प्रस्तावावर तुर्तास कार्यवाही न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्याची आर्थिक स्थिती पुर्वपदावर आल्यानंतर सदर प्रस्तावावर विचार करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्व.वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळाला अनुदान मिळण्याबाबत

**(४२) ५८२५ (२०-११-२०२०). श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्व.वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळाला अनेक वर्षापासून कमी प्रमाणात अनुदान दिले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामधील लाभार्थ्यांची हजारो प्रकरणे प्रलंबित असून त्यांना लाभ मिळत नसल्याने त्यांच्यावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्व.वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळाला भरीव अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०६-०१-२०२१) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

सन २०१६-२०१७ ते २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळास वित्त विभागाकडून अनुदान प्राप्त झालेले नाही. महामंडळाचे भागभांडवल वाढविण्यासाठी वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आले होते. तथापि, वित्त विभागाने सदर प्रस्ताव अमान्य केले आहेत.

तथापि, सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये १) वैयक्तिक कर्ज योजनेवारी व्याज परतावा योजना व २) गट कर्ज योजनेवरील व्याज परतावा योजना व इतर योजना राबविण्याकरीता ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) करीता दिनांक २३/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळास रुपये ३०.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. सदर योजना राबविण्याबाबत महामंडळाकडून प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नालासोपारा (जि.पालघर) पूर्वेकडील मोरेगांव परिसरात बनावट कागदपत्राच्या सहाय्याने अनधिकृत बांधकाम सुरु असल्याबाबत

**(४३) ५९०० (२०-११-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (जि.पालघर) पूर्वेकडील मोरेगांव परिसरात बनावट कागदपत्राच्या सहाय्याने अनधिकृत इमारतीचे बांधकाम सुरु आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोरेगांव येथील सर्व्हे नं. १९० मधील हिस्सा नंबर ३ मध्ये सन २०१७ ते आजपर्यंत ओम साई डेव्हलपर्सतर्फे साई छाया फेस-१ ही अनधिकृत इमारतीचे बांधकाम बनावट कागदपत्रांच्या सहाय्याने बांधण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृत इमारत बांधकामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषी व्यावसायिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०१-२०२१) :** (१) व (२) होय, अशा प्रकारची बाब निदर्शनास आल्याची वस्तुस्थिती वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) वसई-विरार शहर महानगरपालिकेने सदर अनधिकृत बांधकामाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे :-

- मौजे-मोरे सर्व्हे नं. १९०, हिस्सा नं. ३, साई छाया फेज-१ या इमारतीचे बांधकाम मे.ओम साई डेव्हलपर्स तर्फे प्रो.अशोककुमार सिंह व कुल मुखत्यार श्री.सुनील हौसिलाप्रसाद मिश्रा या बांधकाम व्यावसायिकांना दिनांक ०८/११/२०१९ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमा अंतर्गत (एम.आर.टी.पी.) नोटीस बजाविली.

- तसेच पोलीस निरीक्षक, नालासोपारा यांना दिनांक २३/०१/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्याचे पत्र देण्यात आले होते. तसेच सदर बांधकाम व्यावसायिकांवर तुळींज पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर.नं. ०९२७, दिनांक २४/१०/२०२० रोजी फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.
- सदर इमारतीमध्ये लोकांचे वास्तव्य असल्याने दिनांक २४/११/२०२० रोजी इमारत रिकामी करण्याबाबत सर्व रहिवाशांच्या नावे एकत्रित नोटीस देण्यात आलेली आहे व पुढील निष्कासनाची कार्यवाही करण्याची तजविज वसई-विरार शहर महानगरपालिकेने ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाडाळे (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(४४) ५९०७ (०१-१२-२०२०). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाडाळे (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथे सन २००९ मध्ये पाटबंधारे विभागाने बांधलेल्या धरणाकरीता संपादित केलेल्या १६२ शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याने धरणग्रस्त शेतकऱ्यांनी जमिनीचा मोबदला देण्याबाबत जलसंपदा विभाग, जिल्हाधिकारी, ठाणे, उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे विभाग, कल्याण व कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, मुरबाड आदींकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या विधान भवनातील दालनात धरणग्रस्तांचे प्रतिनिधी, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, जिल्हाधिकारी, ठाणे व अन्य संबंधित अधिकारी यांच्यासमवेत मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बैठकीतील घेतलेल्या निर्णयानुसार विभागाने कोणती कार्यवाही केली आहे, तसेच केलेल्या कार्यवाहीची थोडक्यात माहिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०१-०१-२०२१) :** (१) होय.
(२) होय, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०/१०/२०२० रोजी बैठक संपन्न झाली.
(३) कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, शहापूर यांच्या दिनांक २६/०८/२०२० च्या पत्रान्वये कालव्या संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम त्वरीत अदा करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, कल्याण उपविभाग यांना कळविण्यात आले आहे.

दिनांक २०/१०/२०२० च्या बैठकीचे इतिवृत्त दिनांक २७ नोव्हेंबर, २०२० रोजी निर्गमित केले आहे.

मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी सदर रक्कम महसूल विभाग उपविभागीय अधिकारी, कल्याण यांनी एक महिन्यात लाभार्थी शेतकऱ्यांना अदा करण्याचे निर्देश उक्त बैठकीत दिले आहेत.
(४) व (५) महसूल विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार पाडाळे (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील धरणासाठी संपादित झालेल्या जमिनी खाजगी वाटाघाटीव्दारे खरेदी करण्याचा प्रस्ताव लघुपाटबंधारे विभाग, शहापूर यांचेकडून दिनांक ४/०५/२०१८ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर, शासन निर्णय, दिनांक २५/०१/२०१७ मधील नमुना ३ ची जाहीर नोटीस दैनिक “पुण्य नगरी” या वृत्तपत्रामध्ये दिनांक १२/१२/२०१८ रोजी व दैनिक “महाराष्ट्र टाईम्स” या वृत्तपत्रामध्ये दिनांक १३/१२/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तद्‍नंतर जमीन खरेदी करावयाच्या गावातील मागील ३ वर्षाचे खरेदी-विक्री व्यवहार पडताळून दरनिश्चिती करण्याबाबतचा प्रस्ताव सहायक संचालक, नगर रचना यांचेकडे पाठविण्यात

आला असता, त्यांनी गावनिहाय दर निश्चिती करून दिनांक २३/०१/२०१९ रोजी उपविभागीय अधिकारी, कल्याण यांच्या कार्यालयास कळविले आहे. त्यानंतर दिनांक १०/०६/२०१९ रोजीच्या दरनिश्चिती बैठकीमध्ये सदर गावाच्या दर निश्चितीस समिती सदस्य व अध्यक्ष यांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

एकूण ७ गावांपैकी ३ गावांच्या जमिनीच्या खरेदीसाठी आवश्यक कायदेशीर स्वामीत्व अहवाल हे संबंधित वकील यांचेकडून दिनांक २४/०९/२०२० रोजी प्राप्त झाले आहेत. तथापि, उपविभागीय अधिकारी, कल्याण यांचे कार्यालयाचे पत्र दिनांक ०२/११/२०२० नुसार संमतीव्दारे जमीन खरेदी करून देणेकामी विकल्प सादर करणेबाबत एकूण २८२ गटावरील खातेदारांना नोटीस देण्यात आल्या असून जमीन खरेदी करून खातेदारांना मोबदला अदा करणेची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. संपादित जमिनीपैकी १०४ खातेदारांनी जमीन संपादनाबाबत उपविभागीय अधिकारी, कल्याण यांच्या कार्यालयात हरकती दाखल केल्या असून त्यांची सुनावणी घेऊन निर्णय पारीत करून खरेदीचे काम प्रगतीत आहे.

---

## मुंबईतील नागपाडा येथील सिटी सेंटर मॉलमध्ये आग लागल्याबाबत

**(४५) ५९५९ (२०-११-२०२०). श्री.रामनिवास सिंह, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नागपाडा येथील सिटी सेंटर मॉलमध्ये दिनांक २२ ऑक्टोबर, २०२० रोजी भीषण आग लागण्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मॉलमध्ये अंतर्गत अग्निप्रतिबंधक यंत्रणा बंद असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिटी सेंटर मॉलमध्ये आग लागण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर दुर्घटनेप्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर आग “सदोष विद्युत प्रणाली” मुळे लागल्याचे आढळून आले.

सदर प्रकरणी इमारतीचे मालक/भोगवटादार यांच्यावर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

तसेच, सदर मॉलमध्ये बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित न झाल्याने, लायसन्स अभिकरण यांच्यावर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे.

---

## त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी करण्याबाबत

**(४६) ६०१२ (२३-११-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३४० ला दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील कार्यालये, बँका, रेल्वे तसेच टपाल कार्यालयात सन १९७६ च्या धोरणानुसार त्रिभाषा सूत्रानुसार मराठी भाषेचा सक्तीने वापर करावा अशी मागणी माहे फेब्रुवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात मा.मराठी भाषा मंत्री यांनी पत्राव्दारे मा.केंद्रीय गृह मंत्री यांचेकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून याबाबत कोणता प्रतिसाद मिळाला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केंद्र शासनाकडून प्रतिसाद मिळाला नसल्यास त्रिभाषा सूत्रानुसार मराठी भाषेचा सक्तीने वापर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (३०-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर पत्र प्राप्त झाल्याबाबत मा.केंद्रीय गृह मंत्री यांनी दिनांक २०/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या दिनांक २५/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये त्रिभाषा सूत्राच्या अंमलबजावणीबाबत केंद्र शासनस्तरावर निर्गमित केलेल्या सर्व कार्यालयीन ज्ञापनांची माहिती पाठविण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या कार्यालयामधून त्रिभाषा सूत्राचा भाग म्हणून, मराठी भाषेचा वापर प्राधान्याने करण्याची सूचना देण्याबाबत मा.मंत्री (मराठी भाषा) यांनी दिनांक २६/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये मा.केंद्रीय गृह मंत्री यांना विनंती केली आहे.

तसेच विभागाच्या दिनांक ०६/११/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये त्रिभाषा सूत्राच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकाऱ्यांना पुन:श्च निदेशही देण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कर्जाचा बोजा कमी करण्याबाबत

**(४७) ६०१७ (०२-१२-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चालू आर्थिक वर्षात कर्जाचा बोजा रुपये ४ लाख ६४ हजार कोटी असून पुढील आर्थिक वर्षाच्या अखेरीस हाच बोजा रुपये ५ लाख २० हजार कोटींपर्यंत जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याचा कर्जाचा बोजा वाढत जाण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील कर्जाचा बोजा कमी व्हावा व राज्य आर्थिकदृष्टया सक्षम व्हावे याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२८-१२-२०२०) :** (१) होय.

१. सन २०१९-२०२० च्या सुधारित अंदाजनुसार राज्यावर दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी रुपये ४,६४,०२० कोटीचे कर्ज अपेक्षित आहे.

२. सन २०२०-२०२१ अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राज्यावर दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी रुपये ५,२०,७१७ कोटीचे कर्ज अपेक्षित आहे.

(२) राज्य शासन, राज्याच्या विकास प्रकल्प व इतर गरजा जसे की, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान, शेतकऱ्यांची कर्जमाफी, अकल्पीत घटना इत्यादी बाबी विचारात घेऊन तसेच उत्पन्नांचे स्त्रोत यांचा आढावा घेऊन आवश्यक तेवढे कर्ज उभारत असते.

सन २०२०-२०२१ या चालु आर्थिक वर्षात कोविड-१९ या महामारीमुळे टाळेबंदी लावल्याने महसूली स्त्रोत संकुचित झाल्यामुळे तसेच निसर्ग चक्रीवादळ, पूर नुकसान भरपाई इत्यादी बाबी विचारात घेऊन खुल्या बाजारातुन कर्ज उभारण्यात आले आहे.

ग्रामीण पायाभुत विकास निधी, दिर्घकालीन पाटबंधारे निधी योजना, बळीराजा संजीवनी योजना, तसेच बाहयसहाय्यित प्रकल्प जसे मुंबई मेट्रो प्रकल्प, नानाजी देशमुख, ग्रीन एनर्जी कॅरीडोर, महाराष्ट्र रुरल कनेक्टीव्हीटी इंप्रुव्हमेंट व महाराष्ट्र स्टेट रोड इंप्रुव्हमेंटट इत्यादी असे एकूण १३ कार्यान्वित प्रकल्पासाठी कर्ज उभारणी करण्यात येत आहे.

(३) व (४) राज्याचा महसूल वाढीच्या अनुषंगाने संबंधित विभागांना महसूल वाढीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

## राज्यातील आत्महत्याग्रस्त जिल्हयात डॉक्टरांना नियुक्ती देण्याबाबत

**(४८) २४७१२ (२१-०४-२०१७). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १० आत्महत्याग्रस्त जिल्हयातील आरोग्य सेवेला बळकटी देण्याचे शासनाकडून आदेश देण्यात आले होते, त्यानुसार ४१२ डॉक्टरांच्या मुलाखती घेण्यात आला, मात्र त्यांना नियुक्ती दिली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन सदर आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात डॉक्टरांना नियुक्त्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१२-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय, दिनांक २९/०८/२०१६ अन्वये २१३ विशेषज्ञ व शासन निर्णय, दिनांक २०/०९/२०१६ अन्वये १९४ एम.बी.बी.एस. अर्हताधारक उमेदवारांना १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये त्या त्या जिल्ह्यात रिक्त असलेल्या जागेनुसार जिल्हानिहाय नियुक्ती देण्यात आली आहे. त्यानुषंगाने संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे पदस्थापनेसाठी आलेल्या ११७ विशेषज्ञ व ११५ एम.बी.बी.एस. उमेदवारांना संबंधित जिल्हाधिकारी यांचेस्तरावरुन पदस्थापनेचे आदेश देण्यात आले असून त्यापैकी ८२ विशेषज्ञ व ११५ एम.बी.बी.एस. उमेदवार वैद्यकीय अधिकारी या पदावर पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाले आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत राज्यात आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखड्याबाबत

**(४९) २७२९८ (१५-०४-२०१७). श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत राज्यात आरोग्य संस्था स्थापनेचा बृहतआराखडा शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१४१/आरोग्य-३, दिनांक १७ जानेवारी, २०१३ हा सदोषरित्या तयार केल्याबाबत माजी उपसरपंच तथा सदस्य ग्रामपंचायत, पाणजु यांनी याबाबत शासनाकडे लेखी तक्रारीव्दारे

निरनिराळ्या लोकोपयोगी सूचना या आराखड्यात शासनाने समाविष्ट कराव्यात या प्रकारचे अर्ज केले आहेत असे दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी किंवा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच आरोग्य सेवेत कुपोषणग्रस्त विभागात मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिकेतील दिलेल्या आदेशाव्दारे सुचिविलेल्या सूचना तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या आदेशाव्दारे सूचित केलल्या सुचनेवर करावयाची उपाययोजना याचा उल्लेख या आराखड्यात नमूद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१४-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केंद्र शासनाच्या इंदिरा आवास योजनेतून आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांना घर बांधून देण्याबाबत

**(५०) ४७२१५ (०५-०७-२०१९). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या इंदिरा आवास योजनेच्या माध्यमातून आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांना स्वतःचे घर बांधून देण्याबाबतच्या योजनेस मंजूरी देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेमध्ये पात्र झालेल्या नागरिकांनी अनुदान मिळेल या आशेने उसनवारीने तसेच व्याजाने पैसे घेऊन घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले परंतु त्यांना अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाची इंदिरा आवास योजना बंद करुन ती आता पंतप्रधान आवास योजेनच्या नावाने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजना ऑफलाईन आणि ऑनलाईनच्या घोळामध्ये या योजनेतील लाभार्थ्यांना अनुदानापासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.हसन मुश्रीफ (०६-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे. तथापि, सन २०१६-२०१७ पासून इंदिरा आवास योजना बंद करुन या योजनेचे रुपांतर प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये करण्यात आलेले आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.

सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षापासून इंदिरा आवास योजना बंद करण्यात येऊन प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) सुरु करण्यात आली असून सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना PFMS प्रणालीव्दारे थेट त्यांच्या खात्यावर निधी वितरित करण्यात येत आहे.
(४) व (५) ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार यांचेकडून प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०१६-२०१७ या वर्षापासून इंदिरा आवास योजनेंतर्गतचा शिल्लक निधी राज्य स्तरावरील SNA मध्ये वर्ग करण्यात येऊन Online पध्दतीने लाभार्थ्यांच्या अनुदानाची रक्कम वितरित करण्यात येत आहे. ऑनलाईन निधी वितरित करताना ऑर्डरशीट नॉट जनरेटेड, डिलिट ऑर्डरशीट, ग्रीन ऑर्डरशीट अशा स्वरुपाच्या तांत्रिक अडचणी उद्‍भवल्या होत्या. त्यामुळे अनुदान वितरणास विलंब झाला होता.

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी इंदिरा आवास योजना अंतर्गत सन २०१५-२०१६ पुर्वीच्या अपूर्ण घरकुलांना निधी वितरण करणेकामी आवास सॉफ्टवर Single Page Entry लिंक उपलब्ध करुन दिली आहे.

त्यानुसार जुलै, २०१९ पर्यंतच्या आवास सॉफ्टच्या अहवालानुसार २०,३३१ लाभार्थ्यांना क्षेत्रियस्तरावर सदर लिंकच्या आधारे निधी वितरण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.